मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठे अश्व- देशी गोवंश पशु प्रदर्शन

## आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त लक्षवेधी उपक्रम




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गोवंश संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठे अश्व व देशी गोवंश पशू प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पशू पालकांना 'रेकॉर्ड ब्रेक' उपक्रमात सहभागी होण्याची संधी निर्माण झाली आहे. बैलगाडा शर्यत बंदी उठवण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत यशस्वी लढा उभारणारे आणि गोसंवर्धनासाठी चळवळ उभी करणारे गोरक्षक आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने मोशी येथील आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे दि. २५ व २६ नोव्हेंबर २०२३ रोजी भव्य देशी गोवंश प्रदर्शन व पशु आरोग्य शिबीर भरविण्यात येणार आहे. भारतातील सर्व जातीचे अश्व व गोवंश पशू प्रदर्शन तसेच आरोग्य शिबीरासह एकूण १७ प्रकारातील पशूंचा 'रॅम्प वॉक' असलेले हे देशातील पहिले देशी गोवंश पशू प्रदर्शन आहे. देवनी, खिल्लार, लाल कंधारी, साहिवाल, लाल सिंधी, गीर, ओंगोले, वेचूर अशा विविध गोवंशासाठी प्रजातिनिहाय स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे 'रॅम्प वॉक' होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे. कोविड सारख्या महामारीच्या काळात देशी गोवंशाचे आणि त्याच्या उत्पादनाचे महत्त्व जगाला कळले आहे. त्यामुळे याबाबत जनजागृती आणि गो संवर्धनाचा संदेश तळागाळात पोहोचला पाहिजे. तसेच, पुणे जिल्ह्यातील शासकीय व अशासकीय शाळांच्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी. ज्यामुळे भावी पिढीलासुद्धा गोवंशाचे महत्व कळेल. गतवर्षी खिल्लार या एकाच प्रकारातील प्रदर्शनामध्ये २५० हून अधिक गोवंश सहभागी झाले होते. यावर्षी विविध देशी प्रजातींचे दीड हजार पशू प्रदर्शनामध्ये सहभागी होतील, असा अंदाज आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक

» देशी गोवंश प्रदर्शन व पशु आरोग्य शिबीरामध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. या लिंकवर किंवा ९३ ७९ ९० ९० ९० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. पहिल्या ५०० गोपालकांना या प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. दि. ८ नोव्हेंबर ते दि. २० नोव्हेंबर २०२३ पर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे. अखिल भारतीय बैलगाडा संघटना प्रमुख आयोजक असून, पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील गोपालकांसाठी सुवर्ण संधी निर्माण झाली आहे.

# वल्लभनगर येथील 'त्या' कंपनीला देणार नोटीस!

## चारचाकी चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

वल्लभनगर परिसरात एका नामांकित कंपनीकडून मॉलचे काम सुरू आहे. यासाठी पाया खोदण्यात येत असून याची माती घेऊन जाणाऱ्या डंपरची संख्या मोठी आहे. माती घेऊन जाताना ही माती पुणे-मुंबई महामार्गावर पडत आहे. यामुळे पाठीमागून येणाऱ्या दुचाकी चालकांसह चारचाकी चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या कंपनीला महापालिकेच्या वतीने नोटीस देण्यात येणार असल्याची माहिती शहर अभियंता मकरंद निकम यांनी दिली. पुणे-मुंबई महामार्गावर वल्लभनगर परिसरात एका नामांकित कंपनीकडून मॉल आणि शॉपिंग सेंटरचे काम सुरू आहे. यासाठी खोल




पाया खोदला जात आहे. याठिकाणावरून निघणारी माती डंपरमध्ये भरून नेली जात आहे. मात्र, माती घेऊन जाताना संबंधित कंपनीकडून कोणतीही काळजी घेतली जात नाही. माती उधळत रस्त्यावर पडत आहे. त्यामुळे रस्त्यावर मातीच-माती झाली आहे. या परिसरातून जाणाऱ्या-येणाऱ्या दुचाकी चालक, चारचाकी चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात या परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल झाला होता. दुचाकी चालक घसरून पडल्याच्या घटनांही याठिकाणी घडल्या होत्या. याबाबत काही नागरिकांनी महापालिकेकडे तक्रार केली आहे. त्यानंतर आता महापालिकेने पाऊले उचलण्यास सुरूवात केली आहे. याबाबत शहर अभियंता मकरंद निकम म्हणाले, वल्लभनगर परिसरात एका कंपनीच्या बांधकाम साइटचे काम सुरू आहे. रस्त्यावर माती येऊन वाहन चालकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. याची पाहणी करून संबंधित कंपनीला नोटीस देण्यात येणार आहे.

# मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमचे काम डिसेंबर अखेर पूर्ण होणार!

## अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली माहिती



**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या वतीने नेहरूनगर – पिंपरी येथील उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम येत्या डिसेंबर अखेर पूर्ण होणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली. स्थापत्य क्रीडा विभागाच्या चालू असलेल्या कामांच्या स्थळांची पाहणी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी केली. तसेच, इतर कामांची माहिती घेऊन उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकार्यांना दिल्या. त्यांच्यासमवेत सह शहर अभियंता मनोज शेठिया, कार्यकारी अभियंता हनुमंत शिंदे आदी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर या ठिकाणी भेट देऊन क्रीडांगणामधील लॉन टेनिसचे पूर्ण झालेल्या कामाची माहिती घेतली. त्या ठिकाणी सुरु असलेल्या ॲथलेटिक्स ट्रॅक बाबतची पाहणी करून लवकरात लवकर काम पूर्ण करणेबाबत संबंधितांना सूचना केल्या. त्यानंतर भोसरी सर्व्हे क्रमांक १ येथील क्रीडांगण संकुल मधील स्टेडियम गॅलरीच्या चालू कामाची पाहणी करून पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण करून विविध खेळण्यासाठी मैदान उपलब्ध करून द्यावे. तसेच, कुस्ती प्रशिक्षण केंद्रामध्ये ठिकठीकाणी तैलचित्र लावणे अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. कुस्ती प्रशिक्षक अजय लांडगे त्यांचे समवेत होते. खोराटे यांनी बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान व प्राणीसंग्रहालयास भेट दिली. स्वामी ववेकानंद क्रीडा संकुल, कृष्णानगर येथील लॉन टेनिसच्या पूर्ण झालेल्या कामाची पाहणी केली. रायफल शूटिंगच्या चालू कामाचीही माहिती माहिती घेऊन हे काम येत्या दोन महिन्यात पूर्ण करण्याबाबत अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी संबंधितांना सूचना केल्या.

# प्रकाशोत्सवासाठी लखलखत्या आकाशकंदीलास पसंती

## विद्युत रोषणाईसाठी इंडियन माळांना सर्वाधिक पसंती



**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** दिवाळी म्हणजे प्रकाशोत्सव! मग विद्युत रोषणाईच्या जोडीला लखलखता आकाशकंदील तर हवाच. घराचा व अंगणाचा कोपरान् कोपरा प्रकाशमय करण्यासाठी पणत्यांबरोबरच विद्युत दिव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. सध्या बाजारात एका पेक्षा एक आकर्षक आकाश कंदील पाहायला मिळत आहेत. तसेच विद्युत रोषणाईच्या खरेदीही मोठ्या प्रमाणात केली जात आहे. सध्या शहरात पिंपरी कॅम्प, चिंचवड गाव, प्राधिकरण, कस्तुरी मार्केट परिसर या भागात आकाशकंदीलचे स्टॉल लागले आहेत. या स्टॉलवर पारंपारिक आकाशकंदीलांसोबत वेत, टोपल्या, कागद, पुठ्ठा, हातकागद यांपासून तयार केलेल्या आकाशकंदीलचे असंख्य प्रकार पाहायला मिळत आहेत. लेस, मणी, आरसे यांचा वापर करून सजविलेले हे आकाशकंदील अधिकच आकर्षक दिसत आहेत. साध्या व लहान आकारांच्या आकाश कंदीलच किंमत शंभर रुपयांपासून पुढे आहे. अनेकदा दारात लहान-लहान आकाशकंदीलच माळच लावली जाते. यामध्येही यावर्षी नावीन्यपूर्ण डिझाईन बघायला मिळत आहेत. जरदोसी वर्क, मिरर वर्क व लेस लावलेल्या या लहान आकाश कंदीलांची किंमत दोनशे रुपये प्रति डझनपासून पुढे आहे. दिवाळीत घरोघरी आकर्षक रोषणाई केली जाते. यामध्ये विद्युत रोषणाईच्या माळांचा सर्रास वापर केला जातो. याच्या जोडीला सध्या झुंबर, विद्युत तोरणे यांची देखील मागणी वाढली आहे. फायबर व क्रिस्टल झुंबरांमध्ये विविध रंगाची रोषणाई परावर्तित होत असल्याने या झुंबरांना अधिक मागणी आहे. एक फूट ते चार फूट उंचीचे असणाऱ्या या झुंबरांची किंमत अडीचशे रुपयांपासून पुढे आहे. विद्युत रोषणाईसाठी इंडियन माळा, वॉटरफॉल, हृ दयाच्या आकाराच्या माळा यांसारख्या माळांना मागणी आहे.

> “ ‘दिवाळीमध्ये विद्युत रोषणाईसाठी इंडियन माळांना सर्वाधिक पसंती मिळत आहे. गेल्या वर्षी चांदणीच्या आकाराच्या माळा नागरीकांची पसंती होती. आता त्याच प्रकारात हृदयाच्या आकाराच्या माळा विक्रीस आलेल्या आहेत.’
>
> – **महेश नागराणी**, विक्रेता, पिंपरी

> “ ‘या वर्षी आकाशकंदीलचे दर काही प्रमाणात वाढले आहेत. पारंपारिक व फॅन्सी अशा दोन्ही प्रकारच्या आकाशकंदील यंदा विकत घेतले जात आहेत. यामध्ये फोल्डेबल व लहान आकाशकंदीलांच्या माळा विकत घेण्याकडे नागरिकांचा कल आहे.’
>
> – **नलिनी सावंत**, विक्रेत्या, पिंपरी

# ग्रामीण भागावर अजित दादांचे वर्चस्व!

पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी। जिल्ह्यातील २३१ ग्रामपंचायतींच्या झालेल्या निवडणुकांमध्ये सर्वाधिक ग्रामपंचायती ताब्यात घेत उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व पुन्हा सिद्ध झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर प्रथमच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अजित पवार यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी १५८ ग्रामपंचायती जिंकल्याचा दावा केला. दरम्यान, भाजपकडे १९, काँग्रेस ११, शरद पवार गट पाच, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेकडे प्रत्येकी चार ग्रामपंचायती आल्याचा कल असून अपक्षांनी २९ ग्रामपंचायतींवर वर्चस्व मिळविले आहे. बारामती तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतींपैकी ३० ग्रामपंचायतींवर अजित पवार गटाने वर्चस्व मिळविले आहे. दोन ग्रामपंचायती भाजपने जिंकल्या आहेत. आंबेगावात ३० पैकी २५

## बारामती तालुक्यातील दोन ग्रामपंचायती भाजपकडे



ग्रामपंचायतींवर अजित पवार गटाचे, तर दोनमध्ये शिवसेना आणि तीन ग्रामपंचायतींवर अपक्षांनी सत्ता मिळविली आहे.भोरमध्ये २७ पैकी नऊ ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर आठ ग्रामपंचायतींवर काँग्रेसने झेंडा फडकवला असून नऊ जागांवर अपक्ष, तर एक जागा रिक्त राहिली आहे. जुन्नर तालुक्यातील २६ पैकी २० ग्रामपंचायती अजित पवार गटाने ताब्यात घेतल्या आहेत, तर दोन ग्रामपंचायतींवर भाजप आणि चार ग्रामपंचायतींवर अपक्षांनी विजय मिळविला आहे. खेड तालुक्यात २५ पैकी २४ ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर एका जागेवर भाजपने विजय मिळविला. मुळशी तालुक्यात २३ पैकी १२ ठिकाणी अजित पवार गट, तर शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांना प्रत्येकी चार ग्रामपंचायतींवर विजय मिळविला आहे, तर तीन ग्रामपंचायतींवर अपक्षांनी वर्चस्व मिळविले. मावळात १९ पैकी १३ ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर सहा ग्रामपंचायतींवर भाजपने वर्चस्व मिळविले आहे. पुरंदर तालुक्यात १५ पैकी पाच ठिकाणी अजित पवार गट, तीन ठिकाणी काँग्रेस, दोन शिवसेना, तर पाच ग्रामपंचायतींवर अपक्षांनी वर्चस्व मिळविले. दौंड तालुक्यात ११ पैकी सहा ठिकाणी अजित पवार गट, चार ठिकाणी भाजप, तर एका ठिकाणी अपक्ष, शिरूरमध्ये आठपैकी तीन ठिकाणी अजित पवार गट, दोन भाजप, एका ठिकाणी शरद पवार गट, तर दोन अपक्षांकडे आल्या आहेत. इंदापूरात सहा ग्रामपंचायतींपैकी पाच ठिकाणी अजित पवार गट, एका ठिकाणी भाजप, वेल्हा तालुक्यात सहापैकी चार ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर एक ठिकाणी भाजप आणि एका ठिकाणी अपक्षांनी विजय मिळविला आहे.

हवेलीत तीनपैकी दोन ठिकाणी अजित पवार गट, तर एका ठिकाणी अपक्षांनी विजय मिळविला. ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये संपूर्ण जिल्ह्याचे बारामती तालुक्याकडे लागून राहिले होते. याठिकाणी सर्वाधिक ३२ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत तब्बल ३० ठिकाणी अजित पवार यांचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, दोन ग्रामपंचायतीवर भाजपने विजय मिळवत बारामती तालुक्यात चंचुप्रवेश केला आहे. खेड आणि आंबेगाव तालुक्यात दिलीप मोहिते- पाटील आणि दिलीप वळसे- पाटील यांनी ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. मावळमध्ये सुनील शेळके, इंदापूरमध्ये माजी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, दौंडमध्ये रमेश थोरात यांचे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत वर्चस्व राहिले आहे.

### निवडणुकीत ८०.५२ टक्के मतदान

» राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार हे शिंदे फडणवीस यांच्या सरकारमध्ये जाऊन उपमुख्यमंत्रीपदी विराजमान होऊन चार महिन्यांचा कालावधी होऊन गेला त्यानंतर काल राज्यातील अनेक भागांत ग्रामपंचायत निवडणुका झाल्या. त्यामध्ये शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांची महायुती आणि शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट, काँग्रेस महाविकास आघाडी या दोन्हींपैकी कोणत्या विचाराच्या ग्रामपंचायतीच्या पॅनलला मतदान केले जाते याकडे सर्वांचे होते. हवेली तालुक्यात शरद पवार यांच्या पॅनलला पसंती मिळाल्याचे दिसून आले. जिल्ह्यातील मुदत संपणार्या २३१ पैकी १८६ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक, तर १४२ पैकी ३१ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक पार पडली. पुणे जिल्ह्यात रविवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ८०.५२ टक्के इतके, तर पोटनिवडणुकीत ७९.६८ टक्के इतके मतदान झाले. आज हवेली तालुक्यातील कोलावडे साष्टे, खामगाव मावळ येथील मतमोजणी मामलेदार कचेरी येथे पार पडली.

# राज्यभरातील वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्याला धोका!

पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी। राज्यभरात अनेक शहरांमध्ये प्रदूषणाची पातळी वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) दोनशेपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाने आता पावले उचलली आहेत. हवा प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचू नये, यासाठी उपाययोजना करण्यास

## राज्य सरकारकडून खबरदारीच्या उपाययोजनांना सुरुवात



सुरुवात करण्यात आली आहे. हिवाळ्यामुळे वातावरणातील प्रदूषित वायू आणि धुलिकण हे हवेतच राहिल्याने हवेची गुणवत्ता खराब होते. त्यामुळे मानवी आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतात. या महिन्यात राज्यात विविध शहरांची हवेची गुणवत्ता खराब झालेली असून, हवा गुणवत्ता निर्देशांक दोनशेच्या पुढे गेल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सर्व जिल्हे आणि महापालिकांच्या प्रशासनाला आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, अशी माहिती आरोग्य सेवा विभागाचे सहसंचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी दिली. राज्यातील १७ शहरांमध्ये वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या तीव्र आजारांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. प्रत्येक शहरातील रुग्णालयांच्या आपत्कालीन विभागामध्ये तीव्र श्वसनासंबंधी आजारांचे सर्वेक्षण करण्यात येईल. शहरांसाठी नोंदविलेली दैनंदिन एक्यूआय पातळी आणि श्वसनाच्या आजारांचे रुग्ण यांची माहिती संकलित केली जाईल. वायुप्रदूषणाशी संबंधित आजार आणि रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी नोंदविली जाणार आहे.

# त्या बचत गटांची दिवाळी अंध:कारमय!

## महापालिकेकडून लाखोंची बिलं थकली

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या बालवाड्यांना शालेय पोषण आहार पुरविणाऱ्या दीडशेहून अधिक महिला बचत गटांचे मार्चपासूनचे बील अद्यापही थकले आहे. त्यामुळे उधार-उसनवारी करून या मुलांना पोषण आहार पुरविण्याची वेळ या बचत गटांवर आली आहे. प्रत्येक बचत गटाचे सरासरी प्रति महा १५ हजार रूपये पालिकेकडे थकीत आहेत. ऐन दिवाळीपूर्वी तरी महापालिका आमची उधारी चुकवणार का, असा सवाल या महिलांनी केला आहे. शिक्षण मंडळाच्या बालवाड्यांमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना महिला बचत गटांच्या माध्यमांतून पोषण आहार देण्यात येतो. यात पोहे, उपीट, दाल खिचडी, दलिया, इडली यासारख्या अन्न पदार्थांचा समावेश आहे. शहरातील सुमारे १५० बचत गटांच्या ७५० हून अधिक महिला हा पोषण आहार तयार करतात.




महापालिकेच्या शिक्षण विभागाने या पोषण आहाराचे बील दरमहा देणे अपेक्षित आहे. परंतु, प्रशासनाने मार्चपासून अद्याप हे बील दिलेच नसल्याचे समोर येत आहे. शालेय सुट्ट्यांचा महिना वगळता प्रत्येक बचत गटाचे सरासरी १५ हजार रूपये या प्रमाणे साधारण पाच ते सहा महिन्यांचे बील थकीत आहे. सुमारे सव्वा महिन्यापूर्वी बचत गटाच्या सदस्य महिलांनी या संदर्भात महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, शिक्षण मंडळातील अधिकाऱ्यांनी त्यांना फोन करून आठ दिवसात बील काढण्याचे आश्वासन देत त्यांना आयुक्तांची भेट घेण्यापासून रोखले.

परंतु, सव्वा महिन्यानंतरही या बचत गटांपैकी कोणाचेही बील दिले गेले नाही. त्यामुळे बचत गटांच्या प्रतिनिधींनी सोमवारी महापालिका आयुक्त तथा प्रशासक विक्रमकुमार यांची भेट घेतली. दरम्यान, शिक्षण मंडळाने या संदर्भात ठराव केला नसल्याने बील दिले जात नसल्याचे अधिकारी सांगत असल्याचा दावा बचत गट सदस्यांनी केला आहे. या बचत गटांची बिले का दिली गेली नाहीत, याची माहिती घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. बिले दिली गेली नसल्यास नेमकी अडचण काय आहे, याची माहिती घेऊन त्याची पूर्तता करून बिले दिली जातील, अशी माहिती पुणे महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक विक्रमकुमार यांनी दिले आहे. बालवाडीतील मुलांना दररोज १०० ग्रॅम पोषण आहार दिला जातो.

### सहा महिन्यांचे बील थकीत

» शिक्षण मंडळाच्या बालवाड्यांमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना महिला बचत गटांच्या माध्यमांतून पोषण आहार देण्यात येतो. यात पोहे, उपीट, दाल खिचडी, दलिया, इडली यासारख्या अन्न पदार्थांचा समावेश आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाने या पोषण आहाराचे बील दरमहा देणे अपेक्षित आहे. परंतु, प्रशासनाने मार्चपासून अद्याप हे बील दिलेच नसल्याचे समोर येत आहे. शालेय सुट्ट्यांचा महिना वगळता प्रत्येक बचत गटाचे सरासरी १५ हजार रूपये या प्रमाणे साधारण पाच ते सहा महिन्यांचे बील थकीत आहे. सुमारे सव्वा महिन्यापूर्वी बचत गटाच्या सदस्य महिलांनी या संदर्भात महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, शिक्षण मंडळातील अधिकाऱ्यांनी त्यांना फोन करून आठ दिवसात बील काढण्याचे आश्वासन देत त्यांना आयुक्तांची भेट घेण्यापासून रोखले.

त्यापोटी प्रति विद्यार्थी ६ रुपये प्रमाणे मोबदला दिला जातो. हा दर २०१३ पूर्वीचा आहे. मात्र, या तुलनेत गॅस, धान्य, भाज्या, वाहतूक खर्चातील वाढ याचा विचार करता महागाई प्रचंड वाढली आहे. त्यामुळे आम्हाला किमान दहा रूपये प्रति विद्यार्थी दर मिळावा, अशी मागणीही आम्ही पूर्वीपासून केली आहे. परंतु, ही मागणी मान्य होण्याऐवजी आमची पूर्वीचीच देणी थकीत राहिल्याने सर्वच बचत गटांसमोर अडचणी उभ्या टाकल्या आहेत, असे लष्कर ए भीमाच्या महिला अध्यक्ष साधना मिसाळ यांनी सांगितले.

# अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांकडून दंड वसूल!

## अतिरिक्त शुल्क न आकारण्याच्या व्यावसायिक महाविद्यालयांना सूचना

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना पुढील शैक्षणिक वर्षापासून स्टेशनरी, ओळखपत्र, ग्रंथालय, प्रयोगशाळा, जिमखाना अशा कोणत्याच बाबींसाठी वेगळे शुल्क आकारता येणार नाही. त्याचप्रमाणे शुल्क उशिराने भरले, म्हणून दंडही आकारता येणार नाही. प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना केवळ शुल्क नियामक समितीने (एफआरए) ठरवून दिलेले शुल्कच भरावे लागेल. विद्यार्थ्यांकडून वारंवार अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांकडून एकूण जमा शुल्काच्या दुप्पट दंड वसूल करण्यात येणार आहे. 'एफआरए'कडून साधारण २२०० व्यावसायिक महाविद्यालयांचे शुल्क ठरविण्यात येते. 'एफआरए'ने पुढील २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी इंजिनीअरिंग, एमबीए, एमसीए, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर, एमबीबीएस, एमएस, ॲग्रिकल्चर कोर्सेस अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्यासाठी अंतिम नियमावली नुकतीच जाहीर केली आहे.



त्यानुसार महाविद्यालयांच्या मनमानी कारभाराला आणि विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्याच्या मुजोरीला लगाम लावण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहे.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकडून प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क (ट्युशन फी) आणि विकसन शुल्क (डेव्हलपमेंट फी) घेणे अपेक्षित आहे; मात्र, महाविद्यालयांकडून स्टेशनरी, ओळखपत्र, ग्रंथालय, प्रयोगशाळा, जिमखाना, क्लब आदी प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र शुल्क आकारण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर अनावश्यक व कमीत कमी १५ ते २० हजार रुपयांचा भुर्दंड पडतो. त्यानंतर प्रवेश, नोंदणीसाठी किंवा इतर कोणत्याही सुविधेसाठी अतिरिक्त शुल्क घेण्यात येते. विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्काची रक्कम थोड्या उशिराने भरल्यास, त्यावर अतिरिक्त शुल्क लावण्यात येते किंवा दंडाद्वारे जादा शुल्क आकारण्यात येते. पुढील शैक्षणिक वर्षापासून अशा कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारता येणार नसल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. अशा पद्धतीने अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांकडील ही संपूर्ण रक्कम अतिरिक्त 'इन्कम' म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे ही रक्कम महाविद्यालयाच्या एकूण खर्चातून वजा करण्यात येईल. या पद्धतीने महाविद्यालयाचे वार्षिक शिक्षण शुल्कही कमी होईल, असे नियमात सांगण्यात आले आहे. महाविद्यालयांमधील सामान्य सुविधांसाठी अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांना, त्यांच्या पहिल्या चुकीसाठी एक लाख, तर दुसऱ्या चुकीसाठी दोन लाख आणि तिसऱ्या चुकीसाठी पाच लाख रुपयांचा दंड आकारण्यात येईल.